**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited "A" Grade

स्थापना वर्ष १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र ,भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

**Ph.D. Section** विद्यावाचस्पती विभाग

| PH.D. Office :- (0240) 2403122 | WEB SITE : www.bamu.ac.in | : http://bamua.digitaluniversity.ac. | E-mail : phdsection@bamu.ac.in |
|---|---|---|---|

***Ref. No. Ph.D./2021-22/*** 14595 ***Date: 11/02/2022.***

# परिपत्रक

संदर्भ क्र.

१] Ref. No. 4200/ Date. 01/09/2021.

२] Ref. No. 13802/ Date. 02/02/2022.

३] Ref. No. Acad/AFFIL/ARW/2020-21/7415. Date. 17/06/2020.

४] विद्यापीठ अनुदान आयोगाचे २०१७ तील मार्गदर्शक सूचना.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. अंतर्गत येणाऱ्या संलग्नित महाविद्यालयातील, संशोधन केंद्र प्रमुख व विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते कि, विद्यापीठामध्ये आचार्य पदवीसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरु आहे. त्यामध्ये विद्यार्थी हिताच्या दृष्टीने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहे.

१] संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांना आचार्य पदवीसाठी निर्धारित प्रवेश क्षमता ठरवून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये वाढ करावयाची असल्यास संबंधित विषयामध्ये संशोधांसाठी संबंधित महाविद्यालय,विद्यापीठाच्या अध्यादेश क्रमांक. १००९ मधील तरतुदीनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार, आवश्यक त्या सोई सवलती. उदा. संशोधन मार्गदर्शक, ग्रंथालय, प्रयोगशाळा, उपकरणे, ह्यांची उपलब्धता असल्यास वाढीव प्रवेश क्षमते साठी प्रस्ताव महाविद्यालयाने विद्यापीठाकडे आवश्यक त्या सह पत्रांसह सादर करावे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालय व शैक्षणिक विभाग ह्यांनी आचार्य पदवीसाठी प्रवेश क्षमता ***(Manageable Seats),*** निश्चित करून मान्यतेसाठी विद्यापीठाकडे मान्यतेसाठी सादर करावे.

२] विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या संलग्नित महाविद्यालयामध्ये व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये कार्यरत विद्यापीठ मान्यता प्राप्त संशोधक मार्गदर्शकांना विद्यापीठाने मान्यता दिलेल्या संशोधन केंद्रामध्ये मार्गदर्शन करण्याची विद्यापीठाच्या परिपत्रक क्रमांक. 4200/ Date. 01/09/2021. नुसार मुभा देण्यात आलेली आहे. संबधित संशोधन केंद्राच्या प्राचार्य व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख ह्यांनी ह्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन संबंधित महाविद्यालय/ विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग ह्यांच्या ***'DRC'*** च्या मान्यतेनुसार प्रस्ताव विद्यापीठाकडे पुढील प्रक्रियेसाठी निर्धारित कालावधी मध्ये सादर करण्यात यावे.

३] ज्या विद्यार्थ्यांनी पेट परीक्षा उत्तीर्ण केली व जे विद्यार्थी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या गुणवत्ता यादीनुसार संबधित विषयाच्या निवड यादीत आलेले आहेत. परंतु ज्यांना संशोधन मार्गदर्शक मिळालेले नाही अश्या विद्यार्थ्यांना त्वरित संशोधन मार्गदर्शक मिळणेसाठीचे अर्ज विहित नमुन्यामध्ये भरून संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ ह्यांना सादर करण्यात यावे. संबंधित विद्यार्थ्याला मार्गदर्शक मिळणेसाठी विद्यापीठाकडून योग्य ते सहकार्य मिळेल.

४] विद्यापीठाच्या अध्यादेश क्रमांक. १००९ मधील तरतुदीनुसार प्रत्येक संशोधन केंद्रामध्ये ***(Research Advisery Committiee, Department Research Committee),*** स्थापन करणे आवश्यक आहे. ह्या दोन्ही समितीचे गठण व त्यांची कार्यपद्धती व जबाबदारी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०१७. मध्ये प्रकाशित केलेल्या मार्गदर्शक सूचना व अध्यादेश १००९ मधील तरतुदीनुसार होणे आवश्यक आहे. त्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी नियुक्त केलेले तज्ञ दोन्ही समितीसाठी कार्यरत राहतील व ईतर समिती सदस्यांचे नामनिर्देशन संबंधित संशोधन केंद्राच्या प्रमुखांनी करून ते मान्यतेसाठी प्र-कुलगुरू यांना सादर करावे.

५] आचार्य पदवीसाठी संशोधन करणारे विद्यार्थी किंवा नोंदणी करणारे विद्यार्थी यांच्या काही तक्रारी असल्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार आचार्य पदवी अध्यादेश क्रमांक १००९ नुसार तक्रार निवारण समितीचे गठन करण्यात आलेले आहे. त्यासंबंधी तक्रार असल्यास लेखी स्वरुपात संचालक व परीक्षा व मूल्यमापन मंडळ ह्यांना सादर करण्यात यावे.

करिता माहितीस्तव सादर.

विद्यापीठ परिसर : ][
औरंगाबाद - ४३१००४. ][ संचालक
संदर्भ. क्र. पिएच.डी./२०२१-२२. ][ परीक्षा व मूल्यमापन मंडळ.
दिनांक : -